नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे | Year - 3rd | अंक - ३३७ | Issue - 337 | वार मंगळवार दि. २८ एप्रिल २०२६ | Blow- Tuesday Date 28 April 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com | वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ | Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये | Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 | ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# भारत आणि रशिया संयुक्तपणे वर्षाला वीस लाख मेट्रिक टन युरियाची निर्मिती करणार

## प्रकल्पात भारताच्या तिन्ही कंपन्यांची मिळून संयुक्तपणे व रशियाच्या युरलकेम या कंपनीची प्रकल्पात भागीदारी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : भारत आणि रशिया संयुक्तपणे वर्षाला २० लाख मेट्रिक टन युरियाची निर्मिती करणार आहेत. यासाठी एक प्रकल्प दोन वर्षांत सुरू केला जाईल, असे इंडियन पोटॅशच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले.

सरकारी मालकीच्या प्रोजेक्ट्स अँड डेव्हलपमेंट इंडियाने व्यावहारिक पातळीवर काय शक्य आहे याची चाचपणी केली आणि सकारात्मक अहवाल सादर केला. यानंतर भारत आणि रशिया यांनी संयुक्तपणे वर्षाला २० लाख मेट्रिक टन युरियाची निर्मिती करण्यासाठी करार केला. या जॉइंट व्हेंचर अर्थात संयुक्त भागीदारी करारात भारताकडून इंडियन पोटॅश, राष्ट्रीय केमिकल्स अँड फर्टिलायझर्स आणि नॅशनल फर्टिलायझर्स या कंपन्या सहभागी झाल्या आहेत. रशियाकडून युरलकेम ही कंपनी करारात सहभागी झाली आहे.

प्रकल्पात भारताच्या तिन्ही कंपन्यांची मिळून संयुक्तपणे ५० टक्के भागीदारी असेल तर रशियाच्या युरल-केम या कंपनीची प्रकल्पात उर्वरित ५० टक्क्यांची भागीदारी असेल.

रशियातली युरलकेम ही कंपनी खत निर्मिती क्षेत्रातली एक बलाढ्य कंपनी आहे. या कंपनीसोबत करार केल्यामुळे युरिया निर्मितीसाठीच्या संयुक्त प्रकल्पात भारताला फायदा होईल. भारतातील शेतकऱ्यांना या प्रकल्पाचा सर्वाधिक फायदा होईल, असे तज्ज्ञांचे मत आहे.

संयुक्त प्रकल्पांतर्गत रशियातील समारा येथील तोग्लियाट्टी येथे युरिया निर्मितीचा महाकाय प्रकल्प उभा राहणार आहे. प्रकल्पासाठी इंडियन पोटॅश साडेचार हजार कोटी, राष्ट्रीय केमिकल्स अँड फर्टिलायझर्स साडेचार हजार कोटी आणि नॅशनल फर्टिलायझर्स दीड हजार कोटी रुपयांची गुंतवणूक करणार आहे. उत्पादीत होणारा सर्व साठा भारत आयात करणार आहे.





इफ्को आणि क्रिभको यांनी ओमान ऑईल कंपनीसोबत संयुक्तपणे ओमान इंडिया फर्टिलायझर हा संयुक्त प्रकल्प सुरू केला. या प्रकल्पातून १.६५ दशलक्ष मेट्रिक टन युरियाची निर्मिती होते. या युरियाचा खरेदीदार भारत आहे. आता रशियातल्या महाकाय प्रकल्पातून भारतासाठी वर्षाला २० लाख मेट्रिक टन युरियाची निर्मिती होणार आहे.

भारताची आर्थिक वर्ष २०२६ मधील सर्व प्रकारच्या खतांची एकूण आयात २० दशलक्ष टन पेक्षा जास्त होती. त्यापैकी १० दशलक्ष टन युरियाची आयात होती. आर्थिक वर्ष २०२६ मधील सुमारे ४० दशलक्ष टन युरियाच्या एकूण वापरापैकी, सुमारे ३० दशलक्ष टन युरियाचे उत्पादन देशांतर्गत ३२ प्रकल्पांतून झाली होती. या व्यतिरिक्त ओमान इंडिया फर्टिलायझरमधून मोठ्या प्रमाणात भारतात युरिया येत आहे. लवकरच रशियातील प्रकल्पातूनही भारतात युरिया येणार आहे.

रशियातील प्रकल्पासाठी दिल्लीत पंतप्रधान मोदी आणि रशियाचे अध्यक्ष पुतिन यांच्या उपस्थितीत एका सामंजस्य करारावर स्वाक्षरी झाली होती. आता या प्रकल्पाचे काम प्रगतीपथावर आहे.

रशियातल्या उरालकेम समुहात उरालकेम जेएससी, उरालकाली पीजेएससी आणि टोआझ जेएससी या तीन प्रमुख रशियन कंपन्या आ-हेत. या कंपन्यांची एकत्रित उत्पादन क्षमता सुमारे २५ मेट्रिक टन आहे. पण रशियातल्या महाकाय प्रकल्पामुळे भारताचा युरियाचा प्रश्न सुटण्यास मोठी मदत होणार आहे.

युद्धाच्या पार्श्वभूमीवर भारताचे नियोजन

जागतिक युरिया बाजारात आखाती देशांतील कंपन्यांचा वाटा ४० टक्के आहे. पश्चिम आशियातील युद्धामुळे आखाती देशांतून येणाऱ्या युरियावर प्रतिकूल परिणाम झाला आहे. या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने पर्यायी देशांतून युरियाची आयात करण्याचे नियोजन केले आहे. होर्मुझ सामुद्रधुनीला वळसा घालून अडीच दशलक्ष मेट्रिक टन युरिया आयात करण्यास केंद्र सरकारने मंजुरी दिली आहे. हा युरिया रशिया, अल्जेरिया, नायजेरिया आणि ओमानमधून इंडियन पोटॅश (खझ) भारतात आयात करणार आहे.

# रिक्षा-टॅक्सीचालकांना मराठी बंधनकारकच; परिवहनमंत्री ठाम

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : आगामी १ मे महाराष्ट्र दिनापासून पर-वानाधारक रिक्षा व टॅक्सी चालकांना मराठी भाषा येणे अनिवार्य करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. याबाबत मोटार परिवहन विभागाच्या ५९ प्रादेशिक व उपप्रादेशिक कार्यालयांमार्फत परवाना तपासणी मोहीम राबविण्यात येणार असून संबंधित चालकांना मराठी लिहिता व वाचता येते का, याची पडताळणी केली जाणार आहे. मराठी भाषेचे ज्ञान नसलेल्या चालकांचे परवाने रद्द करण्यात येतील, असा इशारा परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिला होता. त्यानंतर आता महाराष्ट्रात मराठी सक्तीचा वाद पेटताना दिसत आहे. मुंबईतील अनेक चालक-मालक संघटनांनी संपावर जाण्याचा इश-ारा देखील होता. रिक्षा आणि टॅक्सी चालकांसाठी व्यावहारिक मराठी अनिवार्य करण्याचा निर्णय लागू करण्यापूर्वी राज्य सरकारने परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या अध्यक्षतेखाली आज मंत्रालयात बैठक बोलावली होती. यानंतर पत्रकार परिषद घेत सरनाईक यांनी याबाबत सविस्तर माहिती दिली.

अनेक संघटनांच्या उपस्थितीत सकारात्मक चर्चा झाली. महाराष्ट्रात टॅक्सी, रिक्षा चालवायची असेल तर मराठी बोलणं आवश्यक आहे. हे सगळ्यानी मान्य केलं. सगळ्या संघटनांच्या लोकांनी सांगितलं की, आम्ही जमेल तशा मराठी शिकवण्या घेऊ...त्यासाठी सगळ्यांनी मुदत मागितली. ३ महिने, ६ महिने, तर काही जणांनी वर्षभराची मुदत मागितली. यावेळी मुदतवाढी संदर्भात मी त्यांना कुठलाही शब्द दिलेला नाही. उद्या आरटीओची सकाळी १०.३० वाजता बैठक बोलवली आहे. त्यांच्यासोबत चर्चा करू...मुदत हवी असेल तर मुदत देण्याचा आम्ही विचार करू...मात्र त्यांची मुजोरी चालणार नाही. मुद-तवाढ देण्याची आमची तयारी आहे. मात्र अद्याप कुठलाही निर्णय झालेला नाही, असं प्रताप सरनाईक म्हणाले. कुणाच्या रोजी-रोटीवर पाय येता कामा नये. सरकारला कोणाच्याही पोटावर पाय आणायचा नाही. परंतु आम्ही महाराष्ट्रात व्यवसाय करू, मात्र हिंदीतच बोलू, अशी त्यांची भूमिका असेल तर हे चालणार नाही, असं प्रताप सरनाईक म्हणाले. विविध संघटनांनी ऋमुदतवाढ मागितली आहे. त्यावर चर्चा करून मुदत द्यायची की नाही ते ठरवू, मुदत देऊ, पण मुजोरी चालणार नाही, असं प्रताप सरनाईकांनी सांगितले.

# पुणे रेल्वे स्थानकाजवळ वंदे भारत ट्रेनचा डबा घसरला; जीवितहानी नाही

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : पुणे रेल्वे स्थानकाजवळ वंदे भारत ट्रेनचा डबा घसरल्याची घटना घडली आहे. छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथून सोलापूरला जाणाऱ्या वंदे भारत ट्रेनचा डबा पुणे रेल्वे स्थानकाजवळ घसरला आहे. पुणे रेल्वे स्थानकावर प्लॅटफॉर्म क्रमांक तीनच्या दिशेला जात असताना वंदे भारत ट्रेनचा डबा रेल्वे रुळावरुन खाली घसरला आहे. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झालेली नाही. सुरक्षेच्या पार्श्वभूमीवर रेल्वेतील सर्व प्रवाशांना बाहेर काढण्यात आलं आहे. रेल्वे प्रशासनाची टीम घटनास्थळी दाखल झाली आहे. रेल्वे प्रशासनाकडून घसर-लेला डबा पुन्हा रुळावर आणण्याचे प्रयत्न केले जात आहेत. प्रशासनाकडून युद्द पा-तळीवर दुरुस्तीचे प्रयत्न सुरु आहेत.

घटनास्थली मोठी गर्दी जमली आहे. रेल्वे प्रशासनासह पोलीस घटनास्थळी दाखल झाले आहेत. सर्व प्रवाशांना



सुखरुपणे प्लॅटफॉर्म क्रमांक तीनवर नेले जात आहे. अचानक झालेल्या या अपघ-ातामुळे कुणाला दुखापत झालेली नाही. पण यामुळे प्रवाशांना मोठ्या मनस्ताप-ाला जावं लागत आहे. नियोजित वेळेत आपल्याला अपेक्षित ठिकाणी जाता येणार नाही याची खंत प्रवशांना सतावत आहे. असं असलं तरी या घटनेत सुदैवाने कोणती हानी झाली नाही यावरुन समाधानही व्यक्त होत आहे. आता प्रशासानकडून किती वेळात दुरुस्तीचे काम पूर्ण होते? ते पाहणं महत्त्वाचं आहे.

छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथून संध्याकाळी चार वाजता ही ट्रेन निघाली होती. ही ट्रेन पुणे स्थानकाजवळ प्लॅटफॉर्म क्रमांक तीनच्या दिशेला जात असताना या ट्रेनचा डबा रुळावरुन खाली घसरला. वंदे भारत एक्सप्रेसचा सहावा डबा रुळावरुन खाली घसरला आहे. जवळपास दोन ते अडीच तासापांसून ही ट्रेन स्थानबद्ध झाली आहे. घसरलेला डबा पुन्हा रुळावर आणण्यासाठी रेल्वे प्रशासनाकडून शर्थीने प्रयत्न केले जात आहेत. दरम्यान, ट्रेनमधील प्रवाशांमध्ये चिंतेचे वातवरण आहे. आता पुढचा प्रवास कसा करायचा आणि दुरुस्तीला किती वेळ लागतो याबाबत अनिश्चितता आहे. त्यामुळे प्रवासी चिंतेत आहेत. विशेष म्हणजे या घटनेनंतर रेल्वेच्या इतर वाहतुकीवर काही परिणाम होतो का? ते पाहणं देखील महत्त्वाचं आहे. रात्रीची वेळ असल्याने मुंबईहून अनेक गाड्या या पुण्याहून पुढच्या दिशेला जातात. यामध्ये दक्षिण भारतात जाणाऱ्या गाड्यांसह सोलापूर सिद्धेश्वर सुपरफास्ट एक्सप्रेससह इतर गाड्यांचादेखील समावेश आहे. त्यामुळे दुरुस्ती करण्याचं काम युद्ध पा-तळीवर पूर्ण करण्याचं आव्हान रेल्वे प्रशासनापुढे आहे.

**बियाणे उत्पादक संस्था व विक्रेते यांची खरीप हंगाम पूर्व राज्यस्तरीय कार्यशाळा**

**कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांचे प्रतिपादन**

# बोगस बियाणे ओळखण्यासाठी बियाण्यांची डीएनए फिंगर प्रिंट टेस्ट केली जाणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : बियाणे उत्पादक कंपन्या व विक्रेते यांनी शेतक-यांना दर्जेदार आणि गुणवत्तापुर्ण बियाणे उपल्बध करुन द्यावेत, या खरीप हंगामाप-ासून पहिल्यांदाच बोगस बियाणे ओळखण्यासाठी बियाण्यांची डीएनए फिंगर प्रिंट टेस्ट केली जाणार आहे. तसेच बियाणे कायदा व बियाणे नियंत्रण आदेशांचे काटेकोर पालन करावे. अन्यथा शेतक-यांच्या हितासाठी बनावट व निकृष्ट बियाणे उत्पादक आणि विक्रेत्यांवर कठोर कारवाई करण्यात येईल असा इश-ारा कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिला. तसेच बियाण्यांची नोंद ठेवण्यासाठी ‘साथी’ पोर्टलचा वापर बंधनकारक करण्यात आला असून, बियाणे उत्पादक ते शेतकरी या संपूर्ण प्रक्रियेत बियाण्यांची नोंद डिजिटल साखळीच्या स्वरूपात करण्यात येणार आहे. शेतकरी हित हेच सर्वोच्च प्राधान्य असल्याचे प्रतिपादन कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी केले.

आज पुणे येथे शासकीय कृषी महाविद्यालयाच्या डॉ. शिरनामे सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या बियाणे उत्प-ादक संस्था व विक्रेते यांच्या खरीप हंगाम पूर्व राज्यस्तरीय कार्यशाळेत ते बोलत होते.या कार्यशाळेत आगामी हंगामासाठीची पूर्वतयारी, बियाण्यांचे नियोजन, उपलब्धता व वितरण यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. यंदा संभाव्य एल निनो पार्श्वभूमीवर पाण्याचा ताण सहन करणारे व कमी कालावधीतील वाढणारे वाण उपलब्ध



करुन द्यावेत. तसेच जिल्हानिहाय पीक नियोजन मजबूत करुन जर पे-रणी ऊशीरा झाली तर पर्यायी पीक नियोजन तयार करा अशा सुचनाही कृषी मंत्र्यांनी विभागाला दिल्या. याप्रसंगी कृषी राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल, कृषी आयुक्त सुरज मांढरे, महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद महासंचालक राहुल रंजन महिवाल,संचालक रफिक नाईकवाडी, संचालक सुनिल बोरकर, कृषी विभागाचे वरिष्ठ अधिकारी, बियाणे उत्पादक संस्था व विक्रेते यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

पुढे बोलताना कृषी मंत्री दत्त-ात्रय भरणे म्हणाले, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेब, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब व उपमुख्यमंत्री श्रीमती सुनेत्रावहिनी अजितदादा पवार यांच्या नेतृत्वाखाली खरीप हंगाम २०२६ यशस्वी करण्यात येईल. गुणवत्तापूर्ण बियाण्यांमुळे उत्पादनात साधारणतः १५ ते २० टक्क्यांपर्यंत वाढ होऊ शकते, हे लक्षात घेता प्रमाणित व दर्जेदार बियाण्यांची शंभर टक्के उपलब्धता असल्याची खात्री करणं आवश्यक आहे. राज्यात यंदा १४५.२० लाख हेक्टर पे-रणी क्षेत्र अपेक्षित असून, त्यानुसार पिकनिहाय बियाण्यांची गरज निश्चित करण्यात आली आहे. अधिकृत आकडेवारीनुसार, खरीप २०२६ साठी राज्याची एकूण बियाणे गरज २०.१६ लाख क्विंटल इतकी असून, सध्या सुमारे २८.१४ लाख क्विंटल बियाणे उपलब्ध आहे. म्हणजेच गरजेच्या सुमारे १४० टक्के साठा उपलब्ध असून बियाण्यांच्या उपलब्धतेबाबत राज्य मजबूत स्थितीत आहे.

यावेळी कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी सांगितले की, बियाण्यांची उप-लब्धता समाधानकारक असली तरी ती योग्य वेळी आणि योग्य शेतकऱ्यापर्यंत पोहोचणे अधिक महत्त्वाचे आहे. गुणवत्ता, वेळेवर वितरण आणि पारदर्शकता यावर विशेष भर देणे गरजेचे आहे.

केंद्र शासनाच्या ‘साथी’ पोर्टलच्या माध्यमातून बियाणे व्यवस्थापन अधिक पारदर्शक व कार्यक्षम करण्यासाठी विविध सुधारणा करण्यात आल्या आहेत. लॉटनिहाय ट्रॅकिंग, सुलभ विक्री प्रक्रिया, एठझ एकत्रीकरण, फार्मर आयडी आधारित माहिती आणि डढकख-डरश्रश एरीू मोबाईल ॲप यांसारख्या सुविधा यामध्ये समाविष्ट करण्यात आल्या आहेत.

साथी प्रणाली म्हणजे बियाण्यांचा संपूर्ण हिशोब ठेवणारी व्यवस्था आहे. बियाणे कुठं तयार झालं, कुठं गेलं, कोणाला विकलं, सगळं पारदर्शक! म्हणजे आता शेतातून शेतकऱ्यापर्यंत सगळं ट्रॅक करता येतं. त्यामुळे सर्व उत्पादक, पुरवठादार व विक्रेते यांनी सदर प्रणालीचा सक्रीय वापर करावा अशा सुचना कृषी मंत्री दत्त-ात्रय भरणे यांनी दिल्या. कार्यशाळेत बियाणे उत्पादक, विक्रेते आणि विविध संघटनांच्या सहभागातून समन्वय वाढवणे, अंमलबजावणीतील अडचणी सोडवणे आणि गावपा-तळीवर वेळेत बियाणे उपलब्धता सुनिश्चित करण्यावर विशेष भर देण्यात आला. राज्य शासनाने बियाणे पुरवठा साखळी बळकट करणे, हवामान बदलास अनुरूप शेतीला चालना देणे आणि डिजिटल प्रणालींचा विस्तार करण्यासाठी कटिबद्ध असल्याचेही यावेळी स्पष्ट करण्यात आले.

योग्य बियाणे, योग्य वेळी शेतकऱ्यापर्यंत हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी सर्व घटकांनी एकत्रितपणे काम करण्याचे आवाहन ही कृषी मंत्री यांनी केले.

## संपादकीय....

### मजबूत भागीदारी

भारत आणि रशिया संयुक्तपणे वर्षाला २० लाख मेट्रिक टन युरियाची निर्मिती करणार आहेत. यासाठी एक प्रकल्प दोन वर्षांत सुरू केला जाईल. सरकारी मालकीच्या प्रोजेक्ट्स अँड डेव्हलपमेंट इंडियाने व्यावहारिक पातळीवर काय शक्य आहे याची चाचपणी केली आणि सकारात्मक अहवाल सादर केला. यानंतर भारत आणि रशिया यांनी संयुक्तपणे वर्षाला २० लाख मेट्रिक टन युरियाची निर्मिती करण्यासाठी करार केला. या जॉइंट व्हेंचर अर्थात संयुक्त भागीदारी करारात भारताकडून इंडियन पोटॅश, राष्ट्रीय केमिकल्स अँड फर्टिलायझर्स आणि नॅशनल फर्टिलायझर्स या कंपन्या सहभागी झाल्या आहेत. रशियाकडून युरलकेम ही कंपनी करारात सहभागी झाली आहे. प्रकल्पात भारताच्या तिन्ही कंपन्यांची मिळून संयुक्तपणे ५० टक्के भागीदारी असेल तर रशियाच्या युरलकेम या कंपनीची प्रकल्पात उर्वरित ५० टक्क्यांची भागीदारी असेल. रशियातली युरलकेम ही कंपनी खत निर्मिती क्षेत्रातली एक बलाढ्य कंपनी आहे. या कंपनीसोबत करार केल्यामुळे युरिया निर्मितीसाठीच्या संयुक्त प्रकल्पात भारताला फायदा होईल. भारतातील शेतकऱ्यांना या प्रकल्पाचा सर्वाधिक फायदा होईल. संयुक्त प्रकल्पांतर्गत रशियातील समारा येथील तोग्लियाट्टी येथे युरिया निर्मितीचा महाकाय प्रकल्प उभा राहणार आहे. प्रकल्पासाठी इंडियन पोटॅश साडेचार हजार कोटी, राष्ट्रीय केमिकल्स अँड फर्टिलायझर्स साडेचार हजार कोटी आणि नॅशनल फर्टिलायझर्स दीड हजार कोटी रुपयांची गुंतवणूक करणार आहे. उत्पादीत होणारा सर्व साठा भारत आयात करणार आहे. इफ्को आणि क्रिभको यांनी ओमान ऑईल कंपनीसोबत संयुक्तपणे ओमान इंडिया फर्टिलायझर हा संयुक्त प्रकल्प सुरू केला. या प्रकल्पातून १.६५ दशलक्ष मेट्रिक टन युरियाची निर्मिती होते. या युरियाचा खरेदीदार भारत आहे. आता रशियातल्या महाकाय प्रकल्पातून भारतासाठी वर्षाला २० लाख मेट्रिक टन युरियाची निर्मिती होणार आहे. भारताची आर्थिक वर्ष २०२६ मधील सर्व प्रकारच्या खतांची एकूण आयात २० दशलक्ष टन पेक्षा जास्त होती. त्यापैकी १० दशलक्ष टन युरियाची आयात होती. आर्थिक वर्ष २०२६ मधील सुमारे ४० दशलक्ष टन युरियाच्या एकूण वापरापैकी, सुमारे ३० दशलक्ष टन युरियाचे उत्पादन देशांतर्गत ३२ प्रकल्पांतून झाली होती. या व्यतिरिक्त ओमान इंडिया फर्टिलायझरमधून मोठ्या प्रमाणात भारतात युरिया येत आहे. लवकरच रशियातील प्रकल्पातूनही भारतात युरिया येणार आहे. रशियातील प्रकल्पासाठी दिल्लीत पंतप्रधान मोदी आणि रशियाचे अध्यक्ष पुतिन यांच्या उपस्थितीत एका सामंजस्य करारावर स्वाक्षरी झाली होती. आता या प्रकल्पाचे काम प्रगतीपथावर आहे. रशियातल्या उरालकेम समुहात उरालकेम जेएससी, उरालकाली पीजेएससी आणि टोआझ जेएससी या तीन प्रमुख रशियन कंपन्या आहेत. या कंपन्यांची एकत्रित उत्पादन क्षमता सुमारे २५ मेट्रिक टन आहे. पण रशियातल्या महाकाय प्रकल्पामुळे भारताचा युरियाचा प्रश्न सुटण्यास मोठी मदत होणार आहे. जागतिक युरिया बाजारात आखाती देशांतील कंपन्यांचा वाटा ४० टक्के आहे. पश्चिम आशियातील युद्धामुळे आखाती देशांतून येणाऱ्या युरियावर प्रतिकूल परिणाम झाला आहे.

# सत्यनारायण नुवाल, दक्ष खंते यांचे यश अत्यंत प्रेरणादायी : मुख्यमंत्री फडणवीस

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नागपूर : खासगी क्षेत्राच्या माध्यमातून देशाच्या संरक्षण सामग्री उत्पादनाच्या क्षेत्रात अत्यंत मोलाचे योगदान देणारे पद्मश्री सत्यनारायण नुवाल आणि तरुण पीढीचे आदर्श प्रतिनिधी ठरलेले दक्ष खंते या दोघांचेही यश आम्हा साऱ्यांसाठीच अत्यंत प्रेरणादायी असल्याचे गौरवोद्गार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे बोलताना काढले. नाग भूषण अवॉर्ड फाउंडेशनच्या वतीने हॉटेल रेडिसन ब्लू येथील समिट सभागृहात आयोजित आयोजित नाग भूषण पुरस्कार-२०२५ समारंभात प्रमुख अतिथी म्हणून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे बोलत होते. केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी हे या समारंभाच्या अध्यक्षस्थानी होते. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत तसेच अर्थ व नियोजन राज्यमंत्री ॲड. आशीष जयस्वाल यावेळी मंचावर उपस्थित होते. या समारंभात सोलर इंडस्ट्री इंडियाचे अध्यक्ष पद्मश्री सत्यनारायण नुवाल यांना प्रतिष्ठित अशा नाग भूषण पुरस्कार २०२५ ने, तर 'आयरन मॅन ऑस्ट्रेलिया'स्पर्धेचे विजेते दक्ष खंते यांना युवा नाग भूषण पुरस्कार २०२५ ने सन्मानित करण्यात आले. सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांच्या हस्ते त्यांना हे सन्मान प्रदान करण्यात आले.

याप्रसंगी बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, अत्यंत विपरित, खडतर आणि आव्हानात्मक परिस्थितीत किती मोठे कार्य होऊ शकते आणि यशाचे शीखरही गाठता येते, याचे उदाहरणच सत्यनारायण नुवाल यांनी सर्वांपुढे घालून दिले आहे. देशाच्या संरक्षण सामग्री उत्पादनाच्या क्षेत्रात खासगी क्षेत्र कितपत प्रगती साधेल, याची कुठलीही शाश्वती नसतानाच्या काळात नुवाल यांनी या क्षेत्रात पदार्पण केले आणि आता हा उद्योग यशाचे शीखर गाठतो आहे. जगातील सर्वोत्तम दर्जाची शस्त्रास्त्रेही भारत तयार करु शकतो, हे यानिमित्ताने आम्ही दाखवून दिले आहे. ऑपरेशन सिंदूरमध्येही सोलर इंडस्ट्रीच्या योगदानाची अत्यंत मोलाची भूमिका राहिलेली आहे, याकडे मुख्यमंत्र्यांनी लक्ष वेधले.



दक्ष खंते हे भारताच्या नव्या पीढीचे आदर्श असे प्रतिनिधी असून त्यांनी साध्य केलेले यश हे अवर्णनीय आहे. आजच्या तरुण पीढीसाठी ते रोल मॉडेल आहेत. त्यांनी याचप्रकारे नव्या पीढीला प्रेरित करावे, अशी अपेक्षाही यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केली.

भारताची सामर्थ्यवाढ ही जगाची गरज - केंद्रीय मंत्री गडकरी

जगात शांतता नांदावी, सज्जनशक्तीचा प्रभाव कायम रहावा आणि दुर्जनशक्तींवर कायम अंकूश असावा, यासाठी भारताचे संरक्षण सामर्थ्य वाढणे अत्यंत आवश्यक असून त्यादृष्टीने देशात संरक्षण तंत्रज्ञानाचा विकास साधला जात आहे. या कार्यात संशोधन आणि निर्मितीच्या क्षेत्रात सोलर इंडस्ट्री अत्यंत मोलाची भूमिका बजावत असल्याचे प्रतिपादन केंद्रीय रस्ते परिवहन व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी यावेळी बोलताना केले. यावेळी बोलताना गडकरी यांनी सत्यनारायण नुवाल आणि दक्ष खंते या दोन्ही मानकऱ्यांच्या कार्याचा गौरव केला. या दोघांचे आपापल्या क्षेत्रातील यश कायम इतरांना प्रेरणा देणारे ठरेल, असा विश्वासही गडकरी यांनी यावेळी व्यक्त केला.

सत्यनारायण नुवाल आणि दक्ष खंते यांनी साध्य केलेली कामगिरी कायम इतरांना प्रेरणा देणारी ठरेल, असा विश्वास राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांनी यावेळी बोलताना व्यक्त केला. कामगिरीतील सार्थकता ही त्यांच्या यशातील अत्यंत महत्त्वाची बाब आहे. या दोन्ही मान्यवरांचा गौरव हा एकप्रकारे समाजाचाच गौरव आहे, असेही ते यावेळी बोलताना म्हणाले. सत्काराला उत्तर देताना पद्मश्री सत्यनारायण नुवाल व दक्ष खंते या दोघांनीही आपल्या हृदय भावना व्यक्त केल्या. नाग भूषण फाउंडेशनचे अध्यक्ष अजय संचेती, कार्याध्यक्ष विलास काळे, फाउंडेशनचे सचिव निशांत गांधी यावेळी मंचावर उपस्थित होते. कार्यक्रमास मोठ्या संख्येने मान्यवर मंडळी उपस्थित होते. आगामी काळात नाग भूषण पुरस्कारांना देशव्यापी स्वरुप दिले जाणार असल्याची योजना यावेळी फाऊंडेशनच्या वतीने मांडण्यात आली.

# महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजनेअंतर्गत मेंदूविकार, अस्थिरोग, कॅन्सरवरील उपचार देण्याचा मानस : सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेप्रमाणेच महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत मेंदूविकार,अस्थिरोग आणि कर्करोगसारख्या गंभीर आजारांवर जनसामान्यांसाठी उपचार उपलब्ध करून देण्याचा मानस असल्याची घोषणा सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी आज केली. भारती विद्यापीठ अभिमत विश्वविद्यालयाच्या ३१ व्या स्थापना दिन समारंभात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. राज्याचे अपारंपरिक ऊर्जा व दुग्धविकास, दिव्यांग सक्षमीकरण मंत्री अतुल सावे, कुलपती डॉ. शिवाजीराव कदम, कार्यवाह डॉ. विश्वजीत कदम, कुलगुरू डॉ. विवेक सावजी, यावेळी उपस्थित होते. भारती हॉस्पिटल येथील नूतनीकरण केलेल्या एकत्रित महात्मा फुले जनआरोग्य योजना व प्रधानमंत्री जनआरोग्य योजनेचे कार्यालय, अत्याधुनिक नेत्ररोग विभाग व नेत्रपेढी तसेच आय. व्ही. एफ. केंद्राचे उद्घाटन आणि विद्यापीठाच्या वार्षिक अहवालाचे प्रकाशन या प्रसंगी मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

श्री.आबिटकर म्हणाले, दर्जेदार शिक्षणातून गुणवत्ता जपत समाज घडविण्याचे कार्य भारती विद्यापीठामार्फत घडत आहे. श्री.सावे म्हणाले, छत्रपती संभाजीनगरचा विकास झपाट्याने होत असून एक लाख कोटी रुपयांची गुंतवणूक उद्योग व्यवसायात होणार आहे. अशा वेळी कुशल, अकुशल मनुष्यबळाची आवश्यकता मोठ्या प्रमणावर असणार आहे. तसेच आरोग्य व्यवस्थेचीही मोठ्या प्रमाणात गरज भासणार आहे. भारती विद्यापीठाने छत्रपती संभाजीनगरमध्ये शैक्षणिक तसेच आरोग्य सेवा उपलब्ध करून द्याव्यात, असेही श्री. सावे म्हणाले.



डॉ. विश्वजीत कदम म्हणाले, भारती विद्यापीठाचे लवकरच छत्रपती संभाजीनगर येथे भव्य शैक्षणिक संकुल उभे राहणार असून पुण्यात भव्य क्रीडासंकुल उभारण्यात येणार आहे, असेही श्री. कदम म्हणाले.

डॉ. शिवाजीराव कदम म्हणाले, शिक्षणात तंत्रज्ञान हे सहाय्यक साधन आहे, पर्याय नाही. शिक्षणामध्ये मानवीमूल्य, नैतिकता आणि संवेदनशीलता टिकवून ठेवणे तेवढेच महत्त्वाचे आहे.

कुलगुरू डॉ. विवेक सावजी म्हणाले, भारती विद्यापीठ अभिमत विश्वविद्यालयाने २०० हून अधिक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय महत्वाच्या संस्थांशी आणि विद्यापीठांशी शैक्षणिक सहयोग करार केले आहेत. यावर्षी विश्वविद्यालयाला महत्त्वपूर्ण संशोधन प्रकल्पांसाठी २८ कोटी हून अधिक अनुदान नामवंत संस्थांकडून मिळाले आहे. सूत्रसंचालन प्रा. डॉ. राजेंद्र उत्तुरकर, प्रा. डॉ. ज्योती मंडलिक यांनी केले.

# पश्चिम आशियातील घडामोडींच्या पार्श्वभूमीवर महत्त्वाच्या क्षेत्रांबाबत ताजी माहिती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : पश्चिम आशियातील बदलत्या परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर, केंद्र सरकार समन्वित प्रतिसाद उपायांद्वारे महत्त्वाच्या क्षेत्रांमध्ये सज्जता आणि सातत्य राखण्यासाठी सक्रियपणे कार्यरत आहे. ऊर्जा पुरवठा, सागरी ऑपरेशन्स आणि या प्रदेशातील भारतीय नागरिकांना मदत करण्याबाबत उचलण्यात येत असलेल्या पावलांचा तपशील खालीलप्रमाणे आहे:

ऊर्जा पुरवठा आणि इंधन उपलब्धता

पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालय, होर्मुझच्या सामुद्रधुनीशी संबंधित सध्याच्या परिस्थितीच्या संदर्भात, देशभरात पेट्रोलियम उत्पादने आणि एलपीजीचा अखंड पुरवठा सुनिश्चित करण्यासाठी पावले उचलत आहे. मंत्रालयानुसार:

अंमलबजावणी आणि देखरेख कृती

एलपीजीची साठेबाजी आणि काळाबाजार रोखण्यासाठी देशभरात अंमलबजावणीची कारवाई सुरू आहे. काल देशभरात २१०० हून अधिक छापे टाकण्यात आले.

सार्वजनिक क्षेत्रातील, तेल विपणन कंपन्यांनी अचानक तपासणी मोहीम अधिक तीव्र केली असून, कालपर्यंत ३१० एलपीजी वितरणांवर दंड आकारला आहे आणि ७० एलपीजी वितरणांचे परवाने निलंबित केले आहेत.

एलपीजी पुरवठा

घरगुती एलपीजी पुरवठ्याची स्थिती:

: सध्याच्या भू-राजकीय परिस्थितीमुळे एलपीजी पुरवठा प्रभावित होत आहे.

: घरगुती वापरासाठी एलपीजी पुरवठ्याला प्राधान्य देण्यात आले आहे.

: एलपीजी वितरणाच्या कोणत्याही केंद्रावर तुटवडा निर्माण झाल्याची नोंद झालेली नाही.

: काल उद्योग स्तरावर ऑनलाइन एलपीजी सिलेंडर बुकिंगमध्ये सुमारे ९८ म वाढ झाली आहे.

: गळती किंवा गैरवापर रोखण्यासाठी 'डिलीव्हरी ऑथेंटिकेशन कोड' (डीएसी) अर्थात वितरण प्रमाणीकरण संकेतांक आधारित वितरण सुमारे ९४ म पर्यंत वाढले आहे. ग्राहकाच्या नोंदणीकृत मोबाईल नंबरवर हा डीएसी प्राप्त होतो.

: २५.०४.२०२६ रोजी, ५१.८ लाखाहून अधिक घरगुती एलपीजी सिलिंडर्सचे वितरण करण्यात आले.

व्यावसायिक एलपीजी पुरवठा आणि वाटप उपाय:

: संकटपूर्व जितका व्यावसायिक एलपीजी पुरवठा होत होता, त्याच्या सुमारे ७० म पर्यंत आता पुन्हा वाढ करण्यात आली आहे. या ७० म मध्ये १० म हिस्सा हा सुधारणा योजनेशी संबंधित अतिरिक्त वाटपाचा आहे.

: १ एप्रिल २०२६ पासून, ५ किलोचे १९.४४ लाखाहून अधिक एफटीएल सिलिंडर्स विकले गेले आहेत.

: काल देशभरात सुमारे ५ किलोचे ८२,००० एफटीएल सिलिंडर्स विकले गेले.

: ३ एप्रिल २०२६ पासून सरकारी तेल कंपन्यांनी ५ किलोच्या छोट्या एल पी जी सिलिंडरबाबत लोकांमध्ये माहिती आणि जागरूकता निर्माण करण्यासाठी ८,९५० पेक्षा जास्त शिबिरे घेतली आहेत. आणि या कालावधीत असे १,४२,००० पेक्षा जास्त ५ किलोचे एफटीएल सिलिंडरही विकले गेले आहेत.

: काल, १९० हून अधिक शिबिरांमधून ५ किलोचे ३८४६ एफटीएल सिलिंडर्स विकले गेले.

: एप्रिल-२६ (२५.०४.२६ पर्यंत) या महिन्यात, एकूण १,६४,६५५ एमटी (१९ किलोच्या ८६.६६ लाखाहून अधिक एलपीजी सिलिंडर्सच्या बरोबरीचे) व्यावसायिक एलपीजी विकले गेले आहेत.

: २५.०४.२०२६ रोजी, ९१३१ एमटी व्यावसायिक एलपीजी (१९ किलोच्या सुमारे ४.८० लाख सिलिंडर्सच्या बरोबरीचे) विकले गेले.

नैसर्गिक वायू पुरवठा आणि पीएनजी विस्तार उपक्रम

डी-पीएनजी आणि सीएनजी वाहतूक क्षेत्राला १००म वायू पुरवठा करत ग्राहकांना प्राधान्य दिले जात आहे.

खत कारखान्यासाठी एकंदर वायू पुरवठ्यात वाढ करण्यात आली असून, त्याच्या गेल्या सहा महिन्यांच्या सरासरी वापराच्या सुमारे ९५म इतका वायू पुरवठा वाढवण्यात आला आहे.

त्या व्यतिरिक्त, इतर औद्योगिक आणि व्यावसायिक क्षेत्रांना सीजीडी वितरण जाळ्यामार्फत होणारा वायू पुरवठा ८०म पर्यंत वाढवण्यात आला आहे.

मार्च २०२६ पासून, साधारणपणे ५.४५ लाख पीएनजी जोडण्या कार्यान्वित करण्यात आल्या आहेत आणि अतिरिक्त २.६२ लाख जोडण्यांसाठी सुविधा निर्माण करण्यात आल्या आहेत, त्यामुळे या जोडण्यांची संख्या ८.०७ लाखांवर पोहोचली आहे. त्याशिवाय, ६.१४ लाख ग्राहकांनी नव्या जोडण्यांसाठी मागणी नोंदवलेली आहे.

२५.०४.२०२६ पर्यंत, ४२,५०० पीएनजी ग्राहकांनी त्यांच्या एलपीजी जोडण्या मायपीएनजीडी डॉट इन या संकेतस्थळाद्वारे परत केल्या आहेत.

कच्च्या तेलाची स्थिती आणि शुद्धीकरण कारखान्याचे कामकाज

सर्व तेल शुद्धीकरण कारखाने पूर्ण क्षमतेने कार्यरत असून, त्यांच्याकडे कच्च्या तेलाचा पुरेसा साठा उपलब्ध आहे; त्याचवेळी पेट्रोल आणि डिझेलचाही पुरेसा साठा राखला जात आहे. घरगुती वापराची गरज पूर्ण करण्यासाठी शुद्धीकरण कारखान्यातून होणाऱ्या घरगुती एलपीजी उत्पादनात वाढ करण्यात आली आहे.

देशांतर्गत बाजारपेठेसाठी पेट्रोकेमिकलच्या कच्च्या मालाचा पुरवठा अखंडितपणे उपलब्ध होण्याची खात्री करण्यासाठी, विविध मंत्रालयांचा समावेश असलेला एक संयुक्त कार्यगट स्थापन करण्यात आला आहे. त्याचबरोबर, भारत सरकारने ०१.०४.२०२६ रोजी पारित आदेशान्वये, पेट्रोकेमिकल संयुगांचा समावेश असलेल्या तेल शुद्धीकरण कंपन्यांना, सेंटर फॉर हाय टेक्नॉलॉजीने निश्चित केलेल्या महत्त्वाच्या क्षेत्रांसाठी सी३ आणि सी४ वायू विशिष्ट किमान प्रमाणात उपलब्ध करून द्यावेत, अशी परवानगी दिली आहे.

औषध विभाग, रसायने आणि पेट्रो-रसायने विभाग आणि उद्योग आणि अंतर्गत व्यापार प्रोत्साहन विभाग यांच्याकडून प्राप्त झालेल्या विनंतीवरून, औषध आणि रसायन क्षेत्रातील आस्थापनांसाठी दररोज १०००मेट्रीक टनदिवस एलपीजी पूलमधून वायू उपलब्ध करून देण्याची तरतूद करण्यात आली आहे.

९ एप्रिल २०२६ पासून, मुंबई, कोची, विशाखापट्टणम , चेन्नई आणि मथुरा तेलशुद्धीकरण प्रकल्पांनी ७६०० मेट्रीक टनांहून अधिक प्रोपलिन वायूची विक्री केली आहे.

किरकोळ इंधन उपलब्धता आणि किंमत निश्चितीच्या उपाय योजना

देशभरातली किरकोळ इंधन विक्री केंद्रांचे कामकाज सुरळीत सुरू आहे.

पश्चिम आशियातील संघर्षामुळे कच्च्या तेलाच्या किंमतीत अनपेक्षित वृद्धी नोंदवण्यात आली, मात्र ग्राहकहिताचे रक्षण करण्यासाठी, केंद्र सरकारने पेट्रोल आणि डिझेलवरील उत्पादन शुल्कात प्रति लीटर १० रुपयांची कपात केली आहे.

सागरी सुरक्षा आणि जलवाहतूक कार्यचालन

बंदरे, जहाजबांधणी आणि जलमार्ग मंत्रालयाने या क्षेत्रातील भारतीय जहाज आणि खुलाशांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक त्या उपाययोजना केल्या आहेत. मंत्रालयाने नमूद केले आहे की,सागरी वाहतूक सुरळीत आणि विनासायास होण्यासाठी हे मंत्रालय,परराष्ट्र व्यवहार मंत्रालय, भारतीय दूतावास आणि सागरी वाहतुकीच्या क्षेत्रातील भागधारकांशी समन्वय साधून आहे.

प्रदेशातील सर्व भारतीय खलाशी सुरक्षित आहेत आणि गेल्या २४ तासांत भारतीय ध्वज असलेल्या जहाजांशी संबंधित कोणत्याही घटनेची नोंद झालेली नाही.

नौवहन महासंचालनालय नियंत्रण कक्षाने कार्यान्वित झाल्यापासून ७,७५५ दूरध्वनी आणि १६,५१८ पेक्षा जास्त ईमेल हाताळले आहेत. गेल्या २४ तासांत ५७ दूरध्वनी आणि १९२ ईमेल प्राप्त झाले आहेत.

नौवहन महासंचालनालयाने आतापर्यंत २,७६४ पेक्षा जास्त भारतीय खलाशांच्या सुरक्षित मायदेशी परतण्याची सोय केली आहे. यामध्ये गेल्या २४ तासांत आखाती प्रदेशातील विविध ठिकाणांहून परतलेल्या २४ खलाशांचा समावेश आहे.

भारतातील सर्व बंदरांवरील कामकाज सामान्य असून कोठेही कोंडीची नोंद नाही.

प्रदेशातील भारतीय नागरिकांची सुरक्षितता

परराष्ट्र मंत्रालय आखाती आणि पश्चिम आशिया प्रदेशातील घडामोडींवर सतत लक्ष ठेवून आहे. यामध्ये या प्रदेशातील भारतीय समुदायाची सुरक्षितता, सुरक्षा आणि कल्याणावर विशेष भर दिला जात आहे.

माहिती देण्यात आली आहे की:

भारतीय दूतावास आणि कार्यालये चोवीस तास हेल्पलाईन चालवत आहेत आणि भारतीय नागरिकांना सक्रियपणे मदत करत आहेत. ते स्थानिक सरकारांच्या सतत संपर्कात आहेत.

स्थानिक सरकारी मार्गदर्शक तत्त्वे, विमान आणि प्रवासाची स्थिती, दूतावास सेवा आणि समुदायाला आधार देण्यासाठी राबवल्या जाणाऱ्या विविध कल्याणकारी उपायांच्या माहितीसह अद्ययावत सूचना नियमितपणे जारी केल्या जात आहेत.

भारतीय दूतावास या प्रदेशातील विविध संघटना, संस्था, व्यावसायिक गट, भारतीय कंपनी आणि इतर संबंधित घटकांसह भारतीय समुदायाशी सक्रियपणे जोडलेले आहेत.

२८ फेब्रुवारीपासून, सुमारे १२,९६,००० प्रवाशांनी या प्रदेशातून भारताचा प्रवास केला आहे.

युएईमध्ये, विमान कंपन्या परिचालन आणि सुरक्षिततेच्या कारणास्तव युएई आणि भारत दरम्यान मर्यादित व्यावसायिक उड्डाणे सुरू ठेवत आहेत, आज युएई आणि भारत दरम्यान सुमारे ११० उड्डाणे अपेक्षित आहेत.

इराकची हवाई हद्द खुली असून या प्रदेशातील ठिकाणांसाठी मर्यादित उड्डाणे सुरू असून याचा वापर भारताकडे पुढील प्रवासासाठी केला जाऊ शकतो.

इराणची हवाई हद्द मालवाहू आणि खासगी विमानांसाठी अंशत: खुली आहे. भारतीय नागरिकांना इराणचा प्रवास टाळण्याचा सल्ला देण्यात आला आहे आणि जे आधीच इराणमध्ये आहेत त्यांना आपल्या दूतावासाच्या मदतीने जमिनीच्या सीमेवरून बाहेर पडण्याचे आवाहन करण्यात आले आहे. आतापर्यंत, तेहरानमधील भारतीय दूतावासने २,४४५ भारतीय नागरिकांना जमिनीच्या सीमा मार्गाने इराणबाहेर नेण्याची सोय केली आहे.

इस्रायल: इस्रायलची हवाई हद्द खुली आहे आणि या प्रदेशातील ठिकाणांसाठी मर्यादित उड्डाणे पुन्हा सुरू झाली आहेत. याचा वापर भारताच्या पुढील प्रवासासाठी केला जाऊ शकतो.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# मंदिर जतन व संवर्धन आराखड्यातील सुरु असलेली कामे १७ मे पर्यंत पूर्ण करावीत

## जिल्हाधिकारी कार्तिकेयन एस. यांच्या अधिकाऱ्यांना सूचना; भक्तनिवास येथे विविध कामांचा घेतला आढावा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी अधिक मासात मोठ्या प्रमाणात गर्दी होत असल्याने दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांच्या सुविधेसाठी मंदिर जतन व संवर्धन आराखड्या अंतर्गत बाजीराव पडसाळी येथील सुरू असलेली कामे दि.१७ मे पर्यंत गुणवत्तापूर्ण व गतीने पूर्ण करावीत, अशा सूचना जिल्हाधिकारी कार्तिकीयेन एस यांनी दिल्या.







श्री विठ्ठल रुक्मिणी देवस्थान मंदिर जतन व संवर्धन आराखड्या अंतर्गत सुरू असलेल्या कामांचा आढावा बाबत भक्तनिवास येथे बैठक घेण्यात आली या बैठकीस मंदिर समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर, नगराध्यक्षा तथा पदसिद्ध सदस्या प्रणिता भालके, प्रांताधिकारी सचिन इथापे, मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, तहसीलदार सचिन लंगुटे, मंदिर समितीचे सदस्य शकुंतला नडगिरे, डॉ. दिनेशकुमार कदम, संभाजी शिंदे, ज्ञानेश्वर देशमुख जळगावकर, ड.माधवी निगडे, प्रकाश महाराज जवंजाळ, शिवाजीराव म ोरे,जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार, उपकार्यकारी अभियंता भीम ाशंकर मिटकरी, मुख्याधिकारी महेश रोकडे तसेच ऑनलाइनद्वारे पुरातत्व विभागाचे सहाय्यक संचालक विलास वाहणे व वास्तु विशारद तेजस्विनी आफळे उपस्थित होते.

यावेळी जिल्हाधिकारी कार्तिकीयेन एस. म्हणाले, मंदिर जतन व संवर्धन आराखड्या अंतर्गत बाजीराव पडसाळी येथील व्यंकटेश्वर मंदिर, महालक्ष्मी मंदिर, कव्हर शेड आदी कामे तात्काळ पूर्ण करावीत. यासाठी संबंधित कंत्राटदाराने काम ाची गती वाढविण्यासाठी अधिकचे मनुष्यबळ उपलब्ध करावे. पुरातत्व विभाग व संबंधित कंत्राटदार यांनी मंदिर समितीचे सदस्य यांच्या समवेत सुरू असलेल्या कामांची पाहणी करून अपूर्ण कामे तात्काळ पूर्ण करावीत. मंदिरात कोठेही पाण्याची गळती होणार नाही याची दक्षता घ्यावी. दगडी कोटिंग कामे पुर्ण करावीत तसेच प्रांताधिकारी व मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी यांनी सुरु असलेल्या कामांचा दररोज आढावा घ्यावा. महालक्ष्मी मंदिर येथे भिंतींना ओलावा धरत असल्याने त्याची पाहणी करून तात्काळ उपाययोजना कराव्यात त्याचबरोबर पश्चिमद्वार-चे काम तात्काळ सुरू करावे अशा सूचना जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांनी यावेळी दिल्या.

यावेळी मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर म्हणा-ले, बाजीराव पडसाळी येथील कव्हर शेडचे काम सुरू असल्याने श्री विठ्ठलाचे दर्शन घेऊन येणाऱ्या वयोवृद्ध भाविकांना रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी जाताना अडचणी येतात. अधिक मासात भाविकांची होणारी गर्दी लक्षात घेता कव्हर शेडचे काम तात्काळ पूर्ण करावे. तसेच महालक्ष्मी व बालाजी मूर्तींची प्राणप्रतिष्ठापना करण्यासाठी व्यंकटेश्वर मंदिर व म हालक्ष्मी मंदिराचे काम तात्काळ पूर्ण करावे अशा सूचना त्यांनी दिल्या.

यावेळी मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी मंदिर जतन व संवर्धन आराखड्या अंतर्गत सुरू असलेल्या कामांना गती देण्यासाठी मंदिर समितीकडून आवश्यक ते सहकार्य मिळेल. दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांची होणारी गैरसोय लक्षात घेता संबंधित कंत्राटदाराने तात्काळ कामे पूर्ण करावीत असे सांगितले.

बैठकीनंतर जिल्हाधिकारी कार्तिकीयेन एस यांनी श्री विठ्ठल रुक्मि णी देवस्थान मंदिर जतन व संवर्धन आराखड्या अंतर्गत सुरू असलेल्या कामांची पाहणी करुन संबधीतांना आवश्यक सुचना दिल्या.

---

# माझं गाव आरोग्य संपन्न गाव अभियानांतर्गत गुजनूर येथे आरोग्य शिबिर संपन्न



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/एस. के. गायकवाड : महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या माझं गाव आरोग्य संपन्न गाव या अभियान अंतर्गत तुळजापूर तालुक्यातील मौजे गुजनूर या ठिकाणी आरोग्य शिबिर घेण्यात आले.

दि.२५ एप्रिल रोजी समुदाय आरोग्य अधिकारी डॉ. यशवंत नरवडे यांच्या मार्गदर्शनाखाली मौजे गुजनूर तालुका तुळजापूर येथे माझं गाव आरोग्य संपन्न गाव या महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या अभियानांतर्गत आरोग्य शिबिर घेण्यात आले.

प्रारंभी डॉ.यशवंत नरवडे यानी उपस्थितना या शिबिरा विषयी थोडक्यात माहिती देवून या शिबिराला सुरुवात करण्यात आली. या वेळी म ाझं गाव आरोग्य संपन्न गाव या अभियानाबत आरोग्य समिती स्थापन करण्यात आली.तसेच ३० वर्षांवरील नागरिकांची रक्तदाब मधुमेह आरोग्य तपासणी करून औषधे वाटप करण्यात आले.

या प्रसंगी माझं गाव आरोग्य संपन्न गाव या आभियानाबद्दल डॉ. यशवंत नरवडे यानी पूर्ण माहिती सागून या अभियानात ग्राम पंचायतीने उस्फूर्तपणे सहभाग घेऊन आरोग्य संपन्न गाव ठेवण्याचा प्रयत्न करावा असे अवाहन केले. या वेळी आरोग्य सेवक हवालदार राज्जबली आशा कार्यकर्ती वाघमारे ताई,सामाजिक कार्यकर्ते जयभिम वाघमारे, म हादेव मोरे, श्रीकांत स्वामी सह ग्रामस्थ उपस्थित होते.यावेळी अनिता साळूंके,जयश्री नागम ोडे, कमाबाई वाघमारे, सुरेखा नागमोडे सह गावातील एकून ४५ व्यकींची आरोग्य तपासणी करण्यात आली.

# ईगतपुरी तालुका मराठी पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी गोपाळ शिंदे यांची बिनविरोध निवड

निफाड/प्रतिनिधी

नाशिक जिल्हा मराठी पत्रकार संघ रजि. नाशिक सलग्न इगतपुरी तालुका मराठी पत्रकार संघाची वार्षिक निवडणूक घोटी येथील साई श्रद्धा हॉटेलमध्ये उत्साहात संपन्न झाली. या बैठकीत दैनिक सकाळचे ज्येष्ठ पत्रकार गोपाळ शिंदे यांची तालुका अध्यक्षपदी बिनविरोध निवड करण्यात आली.




या प्रसंगी नाशिक जिल्हा मराठी पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष यशवंत पवार यांची प्रमुख उपस्थिती लाभली. जिल्हाध्यक्ष आण्णासाहेब बोरगुडे यांनी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून कामकाज पाहिले.

संस्थापक-जिल्हाध्यक्ष यशवंत पवार यांचे म ार्गदर्शनाखाली पार पडलेल्या या बैठकीत पत्रकार संघटनेच्या बळकटीकरणावर विशेष भर देण्याचा निर्धार करण्यात आला.

नवनियुक्त अध्यक्ष गोपाळ शिंदे हे सामाजिक कार्य, प्रशासनातील अनुभव आणि पत्रकारितेतील विविध विषयांवरील भक्कम पकड यामुळे ओळखले जातात. त्यांच्या निवडीमुळे संघटनेला नवी दिशा आणि गती मिळेल, असा विश्वास यशवंत पवार यांनी व्यक्त केला.

नवनियुक्त कार्यकारणी खालीलप्रमाणे

अध्यक्ष गोपाळ शिंदे, कार्याध्यक्ष ज्ञानेश्वर गुळवे, उपाध्यक्ष राहुल सुराणा, युवराज राजपुरे, संघटक गौरव परदेशी,सह संघटक मच्छिंद्र रुपवते, सरचिटणीस विशाल रोकडे, सह सरचिटणीस विजय कर्डक, खजिनदार किशोर देहाडे, सह खजिनदार निलेश काळे, समन्वयक सुनील गाढवे, कार्यकारणी सदस्य लक्ष्मीकांत शिंदे, शाहबाज शेख, भगीरथ आतकरी, रामभाऊ नाठे

निवडीनंतर बोलताना शिंदे यांनी संघटनात्मक कार्य अधिक प्रभावीपणे, एकजुटीने आणि पत्रकारांच्या हक्कांसाठी लढण्याच्या भूमिकेतून पुढे नेण्याचा निर्धार व्यक्त केला.

या बैठकीस जिल्हा प्रतिनिधी शरद मालूंजकर,माजी तालुकाध्यक्ष तथा माजी पंचायत समिती सभापती पांडुरंग वारुंगसे, नवनाथ गायकर, मावळते तालुका अध्यक्ष पुरष-ोत्तम राठोड, माजी तालुकाध्यक्ष विक्रम पासलकर, विजय बारगजे, जाकीर शेख, प्रभाकर आवारी,राजेंद्र गायकवाड,राम शिंदे, आदींसह सुमारे ३५ पत्रकार उपस्थित होते.

या निवडीनंतर घोटी शहरातील जनसेवा पतसंस्थेचे अध्यक्ष तुषार बोथरा, माजी अध्यक्ष ललित पिचा, संचालक विठ्ठल काळे ,श्रमजीवी संघटनेचे जिल्हा सरचिटणीस संजय शिंदे, तालुका अध्यक्ष गोकुळ हिलम, प्रहार संघटनेचे अध्यक्ष सपन परदेशी तसेच गणेश भगत, दर्शन कडू, सतीश बोराडे आदींनी नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा सत्कार करत शुभेच्छा दिल्या.

बैठकीचा शेवट पत्रकार एकजुटीचा संदेश देत आणि संघटनात्मक कार्य अधिक सक्षम करण्याच्या निर्धार करण्यात आला.

---

## नळदुर्ग शहरात अनेक चौकात महामानवाला अभिवादन करण्यात आले

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयघोषाने नळदुर्ग शहर दुमदुमले

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नळदुर्ग /दादासाहेब बनस-ोडे : नवदुर्गा ऐतिहासिक शहरात दर वर्षाप्रमाणे याही वर्षी महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेची तसेच स्वागत भगवान गौतम बुद्ध मूर्तीचे भावी मिरवणूक काढण्यात आली असून या मिरवणुकी मध्ये चवदार तळ्याचा सत्याग्रह केला आसल्याचा तैल चित्राचा देखावा करण्यात आला होता

प्रथमता तथागत भगवान गौतम बुद्ध महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस नागरू नगरीचे नगराध्यक्ष बसवराज अप्पा धरणे गटनेतील मारुती कारवे नगरसेविका साक्षी नळदुर्गकर डॉ बाबासाहेब आंबेडकर मध्यवर्ती सार्वजनिक जयंती कमिटीचे प्रमुख सुरज कांबळे सह भीमसैनिकाच्या उपस्थितीत पूजन करण्यात आले

यावेळी बौद्धाचार्य तथा पत्रकार दादासाहेब बनसोडे यांनी सर्वांना त्रिशरण पंचशील दिले

यानंतर नळदुर्ग येथून भीमनगर , बुद्ध विहारा पासून मिरवणुकीला सुरुवात झाली असून कसाही गल्ली किल्ला गेट , पोलीस ठाणे , क्रांती चौक , ऐतिहासिक चावडी चौक , भवानी चौक , शास्त्री चौक ,अहिल्याबाई होळकर चौक डॉ बाबासाहेब आंबेडकर संविधान चौक बुद्धनगर डॉ आंबेडकर नगर व्हाया बुद्ध विहारा समोर विसर्जन करण्यात आले





शहरात डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची भव्य मिरवणूक काढण्यात आली यावेळी नळदुर्ग शहरातील नळदुर्ग नगर परिषदेचे बांधकाम सभापती शशिकांत पुदाले , पाणी पुरवठा सभापती तानाजी जाधव नगरसेवक इनामदार लहुजी शक्ती से-नेचे नेते शिवाजी गायकवाड नगरस-ेवक प्रवीण गायकवाड नळदुर्ग शहर पत्रकार संघटनेचे अध्यक्ष सुहास येडगे , ज्येष्ठ पत्रकार विलास येडगे , पत्रकार उत्तम बनजगोळे ,सामाजिक कार्यकर्ते बलदेव ठाकूर ,भाजपाचे श्रमिक पोतदार , पत्रकार श्रीनिवास भोसले , आनंद पुदाले ,सामाजिक कार्यकर्ते संजय विठ्ठल जाधव नळदुर्ग शहरातील भोई समाज तरुण मंडळाच्या वतीने तसेच लोकशाहीर आण्णा भाऊ साठे तरुण मंडळ ,नळदुर्ग शहर पत्रकार संघ यांच्या वतीने डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमा पुजन करण्यात आले . शहरातील विविध पक्षाच्या संघटनेच्या कार्यकर्त्यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिम ांचे पूजन केले

नळदुर्ग येथील आय पी एस अधिकारी मेघना यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पो-लीस निरीक्षक नंदकिशोर सोळुंके , सहाय्यक पोलीस निरीक्षक आनंद कांगुणे पोलीस उपनिरीक्षक ईश्वर नांगरे सह पोलीस कर्मचाऱ्यांनी चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता या मिरवणुकी मध्ये कुठलाही अनुचित प्रकार घडू नये म्हणून सर्व भीम सैनिकाने जबाबदारी स्वीकारली होती मिरवणुकी नळदुर्ग शहरातील बौद्ध उपासक आणि उपासिका मोठ्या संख्येने उपस्थित होते

# पालखी मार्ग, तळांवर सोहळा प्रमुख व विश्वस्तांनी सुचविलेल्या कामांना प्राधान्य

## जिल्हाधिकारी कार्तिकेयन एस.; आषाढी यात्रा २०२६ च्या अनुषंगाने पालखी सोहळा प्रमुख व विश्वस्तांच्या बैठकीचे आयोजन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : आषाढी शुद्ध एकादशी सोहळा २५ जुलै, २०२६ रोजी होणार असून या सोह्यासाठी श्री संत ज्ञानेश्वर महाराज, संत तुकाराम महाराज पालखी सोहळा तसेच अन्य संतांच्या पालखी सोबत पायी मोठ्या प्रमाणात वारकरी भाविक येतात. भाविकांना सोयी सुविधा मिळण्यासाठी पालखी मार्ग तळ तसेच रिंगण सोहळ्याच्या ठिकाणी पालखी सोहळा प्रमुख व विश्वस्तांनी सुचवलेली कामे प्राधान्याने पूर्ण करणार असल्याचे जिल्हाधिकारी कार्तिकेयन एस यांनी सांगितले.

आषाढी यात्रा २०२६ च्या अनुषंगाने पालखी सोहळा प्रमुख व विश्वस्तांच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर, प्रांत अधिकारी सचिन इतापे, मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, तहसीलदार सचिन लंगुटे, मुख्याधिकारी महेश रोकडे, व्यवस्थापक प्रवीणकुमार घम तसेच दहा मानांच्या पालख्यांचे विश्वस्त, सोहळा प्रमुख ऑनलाइन द्वारे बैठकीस हजर होते.



आषाढी यात्रा सोहळ्यासाठी राज्यातील विविध जिल्ह्यातून पालखी सोहळे पंढरपूरकडे प्रस्थान करत असतात. पालखी सोहळ्यासोबत दिवसेंदिवस भाविकांची संख्या वाढत आहे. पालखी सोहळ्या सोबत येणाऱ्या वारकरी भाविकांना पालखी मार्ग व तळांवर कोणतीही गैरसोय होणार नाही याची दक्षता घेऊन अधिकच्या सोयी सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत संबंधित विभागांना आवश्यक त्या सूचना देण्यात येतील. तसेच पालखी मार्गावर सोहळ्यांसाठी वाहतुकीची समस्या निर्माण होऊ नये यासाठी स्वतंत्र वाहतूक अधिकारी यांची नेमणूक करण्यात येईल. पालखी सोहळ्यासोबत येणाऱ्या बैलजोडी यांना चारा पाणी वॉटरप्रूफ तंबू याची देखील सोय करण्यात येईल.

आषाढी यात्रा सोहळा पावसाळ्यात येत असल्याने भाविकांच्या सुविधेसाठी वाटरप्रूफ मंडपची संख्या वाढविण्यात येईल राज्यातील कोणत्याही जिल्ह्यात पालखी सोहळ्यांना काही अडचणी निर्माण झाल्यास संबंधित जिल्हाधिकाऱ्यांशी चर्चा करून त्या अडचणी सोडवल्या जातील. संत ज्ञानेश्वर महाराज पालखी तळाच्या विस्तारीकरण करण्यासाठी भूसंपादनाचे काम सुरू करण्यात आले आहे. तसेच यंदाचा आषाढी यात्रा सोहळा सर्वांच्या सहकार्याने अधिक चांगला कसा होईल या दृष्टीने नियोजन करण्यात येईल असेही जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांनी यावेळेस सांगितले.

यावेळी दहा मानाच्या पालख्यांचे विश्वस्त व सोहळा प्रमुखांनी पालखी मार्ग तसेच पालखीतळाच्या ठिकाणी विविध सुविधा बाबतची मागणी केली. यामध्ये मोबाईल टॉयलेट ची संख्या वाढवावी, पालखी सोहळ्याच्या ठिकाणापासून रुग्णवाहिका सोबत असावी. पालखी मार्गावर वॉटरप्रूफ मंडप ची संख्या वाढवावी. पालखी मुक्कामाच्या शाळा, कॉलेज, समाज मंदिर या ठिकाणी व्यवस्था व्हावी मुक्कामाच्या ठिकाणी स्वच्छता व अखंडित वीजपुरवठा व पिण्याच्या पाण्याचा मुबलक पुरवठा करावा. पालखीतळांसाठी वाढीव जागा मिळावी. मुख्य रस्त्यापासून पालखी सोहळे मुक्कामाच्या ठिकाणी जाताना रस्ते अरुंद असल्याने मोठ्या प्रमाणात गर्दी होते ते रस्ते रुंद करून मिळावेत. पालखी सोहळ्यासोबत येणाऱ्या वारकरी भाविकांचा इन्शुरन्स करावा अशा विविध मागण्या सोहळा प्रमुख व विश्वस्तांनी केल्या.


---

## कळंब येथे संत ज्ञानेश्वर बालक आश्रमात संत चोखामेळा अध्यासन केंद्राचे संचालक सचिन पाटील यांचा सत्कार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब/प्रतिनिधी : वृंदावन फाउंडेशन व संत चोखामेळा अध्यासन केंद्र, पुणे चे संचालक सचिन पाटील यांनी दि. २६ एप्रिल रोजी कळंब येथील संत ज्ञानेश्वर बालकाश्रमास सदिच्छा भेट दिली.

यावेळी आश्रमाचे संचालक ह.भ.प. महादेव महाराज अडसूळ यांनी सचिन पाटील यांचा शाल, श्रीफळ व पुष्पहार देऊन भावपूर्ण सत्कार केला.



देवाची आळंदी येथे संत चोखामेळा अध्यासन केंद्राच्या वतीने आरोग्य केंद्र चालविण्यात येते. या आरोग्य केंद्रास महादेव महाराज अडसूळ यांनी यापूर्वी समई भेट दिली होती, याची आठवणही यावेळी काढण्यात आली. या सत्कार सोहळ्यास धाराशिव जिल्हा मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष सुरेश टेकाळे, माधवसिंग राजपूत, महारुद्र जाधव, तात्या येरमाळकर आदी मान्यवर उपस्थित होते. सचिन पाटील यांनी बालकाश्रमातील मुलांशी संवाद साधून त्यांच्या शिक्षण व आरोग्याविषयी माहिती घेतली. अध्यासन केंद्राच्या माध्यमातून सामाजिक उपक्रम राबविले जातात, अशी माहिती त्यांनी यावेळी दिली.

---

## करमाळा शहरात डासांचा प्रादुर्भाव वाढला; जगताप गटासह नगरसेवकांची मुख्याधिकाऱ्यांना तातडीने 'फॉगिंग' करण्याची निवेदन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी

कामावर शहरामध्ये डासांचा प्रादुर्भाव वाढला आहे त्यामुळे तेथील नगरसेविका सुवर्णाताई आलात यांनी प्रभाग क्रमांक सहा मधील पाणीपुरवठा आणि नळदुरुस्ती प्रश्न अत्यंत प्रभावीपणे मांडला व पिण्याच्या पाण्याची गैरसोय दूर करण्याची मागणी देण्याची केली.

नगरसेविका अश्विनी अब्दुल यांनी शहरातील स्वच्छतेच्या विषयावर आक्रमक पवित्र हे नियमित कचरा उचललेली मागणी केली. नगरसेवका युवराज चिरोटे यांनी कामाचा वाढता व्याप पाहता नगरपालिकेच्या स्वच्छता



कर्मचाऱ्यांची संख्या वाढवण्यासाठी मागणी केली, जेणेकरून शहराची सेवा अधिक कार्यक्षमतेने होईल यावेळी माजी उपनगराध्यक्ष अहमद कुरेशी नगरसेवक प्रशांत ढाळे तुकाराम इंदलकर यांच्यासह जगताप गटाचे प्रमुख पदाधिकारी यांनी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

नगरपालिका प्रशासन या निवेदनाची दखल घेऊन लवकर सर्व प्रभागांमध्ये नाल्यांच्या ठिकाणी आणि दाट वस्तीच्या भागात थोर फवारणी व जंतुनाशी फवारणी करून घेण्याचे आश्वासन दिले आहे.

---

## बेकायदा बांधकाम पाडण्यापूर्वी समोरच्याला बाजू मांडण्याची पूर्ण संधी द्यायला हवी, तरंच तो नैसर्गिक न्याय ठरेल : उच्च न्यायालय



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : एखादं बेकायदेशीर बांधकाम पाडण्यासाठी केवळ २४ तासांची नोटीस देणं योग्य नाही. मुंबई महापालिका प्रशासनानं तोड कारवाई करण्यापूर्वी समोरच्याला त्याची बाजू मांडण्याची, अथवा चूक सुधारण्याची पुरेशी संधी द्यायला हवी. तसंच ही प्रक्रिया केवळ तोंडी नसावी, असंही मुंबई उच्च न्यायालयानं एका निकालादरम्यान मुंबई महापालिका प्रशासनाला बजावलं आहे.

उच्च न्यायालयाचा निकाल काय? : एखाद्याला त्यानं केलेलं बेकायदा बांधकाम पाडण्यासाठी नोटीस देताना हातघाई न करता त्याला त्याची बाजू मांडण्याची संधी द्यायलाच हवी. त्याच्याकडून नेमकी कोणती कागदपत्रे किंवा तपशील आवश्यक आहे, हे त्याला नीट समजावून सांगायला हवं, असे निर्देश न्यायमूर्ती अमित बोरकर यांच्या एकलपीठानं एका निकालात मुंबई महापालिकेला सांगितलं आहे. आपण केलेलं बांधकाम वैध आहे की अवैध, हे सिद्ध करण्याची सर्वस्वी जबाबदारी मालकाचीच आहे. त्यामुळं एखादं बांधकाम अनधिकृत ठरवताना त्या मालकाला रितसर सर्व कागदपत्रे सादर करण्याची संधी द्यायलाच हवी, असं या निकलात मुंबई उच्च न्यायालयानं नमूद केलंय. या प्रकरणात मूळ मालकानं त्याचे बांधकाम नंतर दुसऱ्याला विकलंय, असं महापालिकेच्यावतीनं न्यायालयाला सांगण्यात आलं. मात्र असं जरी असलं तरी बेकायदेशीर बांधकामावर महापालिकेला कारवाई करता येईल. ही कारवाई करताना नव्या मालकाला त्याच्याकडील कागदपत्रं सादर करण्याची व बाजू मांडण्याची संधी द्यावी, असंही मुंबई उच्च न्यायालयानं २२ एप्रिल रोजी जारी केलेल्या आपल्या एका निकालातून स्पष्ट केलंय. काय आहे प्रकरण? : चेतन गाला यांना मुंबई महापालिका प्रशासनाच्यावतीनं त्यांच्या मालमत्तेतील बेकायदा बांधकाम पाडण्याची नोटीस २०११ मध्ये देण्यात आली होती. या नोटीसमधून चेतन गाला यांना प्रशासनासमोर सुनावणीसाठी हजर राहण्यास सांगितले गेले होते. मात्र त्यावेळी त्यांच्याकडून कोणत्याही कागदपत्रांची मागणी करण्यात आली नाही. त्यानंतर महापालिकेनं चेतन गाला यांनी हे अनधिकृत नसल्याचा केलेला दावा फेटाळून लावला. मात्र, या कारवाईत महापालिकेनं त्यांना बाजू मांडण्याची कोणतीही संधीच दिलेली नाही, असा ठपका यावेळी न्यायालयानं ठेवलाय. मुळात एखाद्याला बेकायदेशीर बांधकाम पाडण्याची नोटीस देताना त्याचं म्हणणे देखील महापालिका प्रशासनाने ऐकायला हवं. तरच ती कारवाई नैसर्गिक न्यायदान पद्धतीने झालीय, असे म्हणता येईल. याप्रकरणात नैसर्गिक न्यायदान झाल्याचे दिसत नाही, असे आपल्या आदेशांत नमूद करत उच्च न्यायालयानं ही नोटीस रद्द करत महापालिका प्रशासनाला संबंधित व्यक्तीला नव्यानं नोटीस देऊन त्याच्याविरोधात कायदेशीर कारवाई करण्याची मुभा दिलीय.

---

स्वेरीत 'जागतिक पशुवैद्यक दिना' निमित्त तांत्रिक परिसंवादाचे भव्य आयोजन

माजी कुलगुरू डॉ. एन.पी.दक्षिणकर यांचे प्रतिपादन

## मानवी आरोग्यरक्षक म्हणून पशुवैद्यकांनी कार्य करावे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : 'वर्तमान काळात प्राण्यांपासून, पक्ष्यांपासून मनवांमध्ये अनेक जीवघेण्या आजारांचे संक्रमण होत आहे. त्या संदर्भात पशुवैद्यकांनी दक्ष राहून प्रतिबंध केला पाहिजे. सद्यस्थितीत प्रतिजैविकांच्या बाबतीत सूक्ष्मजीवांचे प्रतिरोधकता वाढली आहे. त्यामुळे प्रतिजैविकांचा वापर, प्रमाण, पद्धत, काळजीपूर्वक निवडली पाहिजे अन्यथा २०२५ साली सूक्ष्मजीवांना प्रतिबंधित करणारे प्रतिजैवकच उपलब्ध न झाल्यास कोट्यावधी जीव नाश पावतील. यासाठी मानवी आरोग्याचे रक्षक म्हणून पशुवैद्यकांना वर्तमान काळात भूमिका बजवावी लागेल.' असे प्रतिपादन कामधेनु विश्वविद्यालय, दुर्ग चे माजी कुलगुरू डॉ. एन.पी.दक्षिणकर यांनी केले.





गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील श्री. विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिटयुट संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस) मध्ये 'जागतिक पशुवैद्यक दिना' निमित्त 'ज्येष्ठ पशुवैद्यक प्रतिष्ठान' व 'स्वेरी' यांनी संयुक्तरीत्या तांत्रिक परिसंवादाचे भव्य आयोजन केले होते. याप्रसंगी कामधेनु विश्वविद्यालय दुर्गचे माजी कुलगुरू डॉ. दक्षिणकर हे तांत्रिक परिसंवादात मार्गदर्शन करत होते तर प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त, पुणेचे डॉ.समीर बोरकर हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. याप्रसंगी व्यासपीठावर परभणीच्या पशुवैद्यक महाविद्यालयाचे माजी सहयोगी अधिष्ठाता प्रा. डॉ. नितिन मार्कंडे, पशुसंवर्धन पुणे विभागाचे माजी सहआयुक्त डॉ.अंकुश परिहार, ज्येष्ठ पशुवैद्यक प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. विश्वासराव मोरे, सचिव डॉ. अनिल सरदेशमुख, मार्गदर्शक डॉ. टी.एन. बेले, सातारा पशुसंवर्धन विभागाचे उपायुक्त डॉ. दिनकर बोर्डे, सांगलीचे उपायुक्त डॉ. अजय थोरे, पशुसंवर्धन विभाग, कोल्हापूरचे उपायुक्त डॉ. प्रमोद बाबर, सोलापूरचे सहाय्यक आयुक्त डॉ. अनिल तांबे, सांगलीचे सहआयुक्त डॉ. विजय ढोके, परभणीचे डॉ. आबासाहेब डक, प्रा.बबन होळ आदी मान्यवर उपस्थित होते. परिसंवादाच्या दुसऱ्या सत्रात ज्येष्ठ पशुतज्ञ डॉ. मार्कंडेय यांनी 'पशुवैद्यकीय पुढील आव्हाने' या विषयावर बोलताना 'दुधाळ गाई म्हशींची दुप्पट दूध उत्पादन करण्याची क्षमता, ओझोन थेअरीचा उपचारात वापर, गर्भधारणा प्रमाणात दुप्पट वाढ, वैद्यकीय धर्तीवर मोठ्या शस्त्रक्रिया दुर्बिणीतून करण्याची सुविधा, कृत्रिम बुद्धिमत्तेचा पशुसंवर्धन मध्ये योग्य वापर आदि बाबी महत्त्वाच्या असून पश्चिम महाराष्ट्रात दुग्ध व्यवसाय प्रगती निष्णात पशुवैद्यकामुळे झालेली आहे आणि त्यांना ही आव्हाने स्वीकारावीच लागतील.' असे प्रतिपादन त्यांनी केले. स्वेरी इंजिनिअरिंग कॉलेजच्या उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार यांनी पशुवैद्यक दिनाच्या शुभेच्छा देवून स्वेरीच्या वाटचालीतील विविध टप्पे आणि मिळालेले यश सांगून स्वेरीचे संस्थापक व प्राचार्य डॉ. बी.पी. रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील वाटचाल यशस्वीरित्या चालू असल्याचे सांगितले. अध्यक्षस्थानावरून बोलताना सहआयुक्त डॉ. बोरकर म्हणाले की, 'शासकीय गतिमानता अभियानात पशुवैद्यकांचा सिंहाचा वाटा आहे. भावी काळात अनेक आव्हाने स्विकारण्याची गरज आहे.' असे सांगितले. दुपारच्या सत्रामध्ये स्वर्गीय डॉ. सुहास देशपांडे जीवनगौरव पुरस्कार हा ऋषितुल्य व्यक्तिमत्व असलेले माजी सहआयुक्त डॉ. संतोष पंचपौर व ज्येष्ठ पशुतज्ञ, प्रभावी वक्ते व पशुपालकांचे मित्र प्रा. नितीन मार्कंडेय यांना मान्यवरांच्या हस्ते देण्यात आला. यावेळी सत्काराला उत्तर देताना डॉ. संतोष पंचपौर म्हणाले की, 'हा सन्मान माझा नसून माझ्या सर्व सहकाऱ्यांच्या कार्याचा, पशुपालकांचा आहे.' अधिष्ठाता प्रा. डॉ.नितिन मार्कंडे यांनी 'राष्ट्रीय उत्पन्नात वृद्धी करणाऱ्या पशुपालकांना हा सन्मान समर्पित करतो.' असे उद्गार काढले. त्यानंतर स्व.डॉ. चंद्रकांत निंबाळकर उत्कृष्ट पशुवैद्य पुरस्कार सघन कुकुट प्रकल्प, सोलापूरच्या डॉ. स्नेहांका बोधनकर, पशुधन विकास अधिकारी, कोल्हापूरचे डॉ. प्रसाद भामरे, डॉ. राहुल दडस, सातारा, कुक्कुट प्रकल्प, पुणेचे डॉ.दीपक अवताडे, जतचे डॉ. कुणाल कांबळे यांना मान्यवरांच्या हस्ते स्मृतिचिन्ह शाल व पुष्पहार देऊन प्रदान करण्यात आले. यावेळी महावेटचे जिल्हाध्यक्ष डॉ. सत्यजित पाटील व राज्य उपाध्यक्ष विजय कोळेकर यांचा सत्कार करण्यात आला. त्याचबरोबर कार्यक्रमास सक्रिय सहभाग देणाऱ्या औषध कंपनी वेलकम वेट फार्मा,विन ब्रिओ फार्मा, मायक्रो लॅब, कन्सन फार्मा, कपिला, हेक्स्टर, मॅन वेट, एनजी रिच, इलंका, क्रोम लॅब, मनोरमा बँक परिवार, वीर बॅक, सचिन शिंदे, कराड या औषध कंपनी प्रतिनिधींचा तसेच डॉ. भास्कर पराडे यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी डॉ. राज सावळकर डॉ. प्रवीण जाधव, डॉ. विजय ढोके, डॉ. शिवराज पवार, डॉ. तानाजी भोसले, डॉ. ब्रह्मानंद कदम, डॉ. संजय हिंगमिरे, डॉ. तानाजी खांडेकर, डॉ. अनिल सरदेशमुख आदींनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमामध्ये सोलापूर, सांगली, सातारा, कोल्हापूर व पुणे या जिल्ह्यातून जवळपास २०० हून अधिक पशुवैद्यक व विद्यार्थी यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. 'असे तांत्रिक परिसंवाद व पशुवैद्यक गुणगौरव कार्यक्रम सातत्याने राबविल्यास आम्हा पशुवैद्यकांना काम करण्यास उर्जा येते.' अशी अपेक्षा नव पशुवैद्यकांनी व्यक्त केली. सोलापूर आकाशवाणीचे माजी निवेदक प्रथमेश बनसोडे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करून आभार मानले.